सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय
राज्य उत्पादन शुल्क भवन, महानगरपालिका सभागृह मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१.
E-mail Id : excise.estmaharashtra@gmail.com

---

वाचा : १) शासन निर्णय क्रमांक इएसटी -१६२२/प्र. क्र.२०३/राउशु-१ दि.२४ जुलै, २०२३.
२) या कार्यालयाचे जाहिरात क्र.इएसटी ११२२/पदभरती २०२२/३२/२अ-३ दि.१७ नोव्हेंबर, २०२३.
३) या कार्यालयाचे सम क्रमांकाचे दि.२०.०२.२०२५ रोजीचे प्रसिध्दीपत्रक.
४) कागदपत्र पडताळणी समितीचा सम क्रमांकाचा दि. १३.०३.२०२५ रोजीचा अहवाल.

---

क्रमांक – इएसटी / जवान भरती २०२२/३२/२-अ-३ मुंबई, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२६.

## आदेश

उपरोक्त वाचा मधील अ. क्र.२ वरील जाहिरातीस अनुसरून सन २०२३-२४ मध्ये राज्य उत्पादन शुल्क विभागात जवान सरळसेवेने भरती प्रक्रिया मे. टी.सी.एस. मुंबई यांच्यामार्फत राबविण्यात आली आहे. सदर भरती प्रक्रियेतील प्रतिक्षायादीतील निवड झालेल्या उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी या कार्यालयाने नेमलेल्या समितीमार्फत करण्यात आली आहे. सदर समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने खालील नमूद निवडपात्र उमेदवारांस या विभागात **जवान (गट-क)** या पदावर त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या प्रवर्गातून (एस-७) (२१७००-६९१००) या वेतनश्रेणीत तात्पुरत्या स्वरुपात खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून नियुक्ती देण्यात येत आहे. तसेच त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या कार्यालयात नियुक्ती देण्यात येत आहे.

**जवान:**

| अ.क्र. | अर्ज क्रमांक | उमेदवाराचे नाव | निवड प्रवर्ग | नियुक्तीचे कार्यालय |
|---|---|---|---|---|
| १. | ९३०१६८००७ | श्री. प्रविण सिद्राम करमले | SC- GEN against EX | अधीक्षक, राउशु, लातूर |

## अटी व शर्ती

१. सदरची नियुक्ती ही केवळ तात्पूरत्या स्वरुपाची असून ती पुर्व सुचनेशिवाय कोणत्याही वेळी समाप्त केली जाऊ शकेल.

२. सदर नियुक्ती आदेशाच्या तारखेपासून तीस (३०) दिवसाच्या आत पद नियुक्तीच्या ठिकाणी हजर होणे आवश्यक आहे. उक्त मुदतीत हजर न झाल्यास त्यांची नियुक्ती रद्द करण्यात येईल.

३. सदर नियुक्ती आदेशान्वये नेमणूकीच्या जागी रुजू होण्याकरीता कोणत्याही स्वरुपाचा प्रवासभत्ता अगर इतर होणारा खर्च अदा करण्यात येणार नाही.

४. सदरची नियुक्ती ही संबंधीत उमेदवाराचा पूर्वचारित्र्य व वर्तणूक यांच्या समाधानकारक पोलीस

विभागाच्या अहवालाच्या तसेच वैद्यकीय दृष्टया शासन सेवेस पात्र अहवालाच्या अधीन राहून, पुढील आदेश होईपर्यंत करण्यात आली आहे व याबाबत असमाधानकारक अहवाल प्राप्त झाल्यास सेवा समाप्ती पुर्व सुचना न देता करण्यात येईल.

५. मागासवर्गीयांसाठी राखीव असलेल्या पदावरील नियुक्तीसाठी शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांबाबत सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दि.१२.१२.२०११ मधील तरतुदीनुसार संबधित उमेदवारांची जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधिन राहून तात्पूरत्या स्वरुपात नियुक्ती करण्यात येत आहे. त्यांनी जाती प्रमाणपत्र पडताळणीसाठी आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे / प्रमाणपत्रे संबंधीत जिल्हयाच्या कार्यालय प्रमुख (अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क) यांच्याकडे तात्काळ उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तसेच कार्यालय प्रमुखाने सदर कागदपत्रे संबधित जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे पाठविल्यानंतर नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत उमेदवाराने जात प्रमाणपत्राची वैधता जात पडताळणी समितीकडून घेणे आवश्यक राहील. विहित मुदतीत जात पडताळणी समितीकडून जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी संबधित उमेदवाराची राहील. तथापि ज्या मागासवर्गीय उमेदवारांची खुल्या प्रवर्गातील पदावर शिफारस करण्यात आलेली असेल त्या उमेदवारांबाबत सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र.सीबीसी-१०/२००४/प्र. क्र.५७०/मावक-५, दि.१६.०५.२००७ नुसार कार्यवाही करण्यात येईल.

६. सामाजिक व समांतर आरक्षणातून निवड झालेल्या उमेदवारांची नियुक्ती ही संबंधीत प्रमाणपत्रे / कागदपत्राची वैधता तपासण्याच्या अधिन राहून तात्पूरत्या स्वरुपात करण्यात येत आहे. याबाबत संबंधीत कार्यालय प्रमुख यांनी अशा उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी संबंधित प्राधिकरणाकडून सत्वर प्राप्त करुन त्यबाबतचा अहवाल सादर करणे आवश्यक राहील. या अहवालामध्ये काही गैर आढळल्यास संबंधीत उमेदवाराची सेवा तात्काळ प्रभावाने रद्द करण्यात येईल.

७. उपरोक्त उमेदवार यांनी शासन अधिसूचना सामान्य प्रशासन विभाग क्रमांक मभाप १०८७ /१४ / सीआर-२ / ८७ / २०, दिनांक ३०-१२-१९८७ व शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक हिंभाप १०८० / १३१ / वीस, दिनांक २५-०५-१९८१ तसेच क्र. हिंभाप १०८३ / १४४८ / तीस, दिनांक ०१-१२-१९८८ मधील तरतुदीनुसार एतदर्थ मंडळाची मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे. तसेच यानंतरही शासन वेळोवेळी विहित करील अशा परीक्षा त्यांनी उत्तीर्ण करणे बंधनकारक राहील.

८. उपरोक्त उमेदवार यांनी शासकिय कर्मचाऱ्यांकरीता विहित केलेल्या महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तवणुक) १९७९ मधील नियमांचे तसेच शासकीय कर्मचाऱ्यांना लागू असणारे सर्व नियम व अटीचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक राहील.

९. वरील निवड झालेल्या उमेदवारांना भविष्यातील पदोन्नतीकरीता किंवा अन्य प्रयोजनाकरीता त्यांची सेवाज्येष्ठता ही त्यांना प्राप्त झालेल्या सदर परिक्षेतील गुणांकनावर आधारीत असेल.

१०. उपरोक्त उमेदवार यांनी त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत स्वग्राम घोषित करणे आवश्यक आहे. तद्नंतर त्यांनी स्वग्राम घोषित केल्यास सेवा कालावधीत घोषित केलेल्या स्वग्रामामध्ये त्यांना बदल करता येणार नाही.

११. उमेदवारास शासन सेवेत रुजु होताना (अ) शासन निर्णय राजकीय व सेवा विभाग १५८१/३४. दि.०९.०८.१९४७ मध्ये विहित केल्यानुसार वचन लिहून द्यावे लागेल. (ब) शासन निर्णय सा. प्र. वि. क्र. ओओडी १०६४/३४४३/३२ व दि.२३.०६.१९६४ मध्ये विहित केल्यानुसार भारतीय घटनेस एकनिष्ठ

राहण्याची शपथ घ्यावी लागेल.

१२. उपरोक्त उमेदवार यांनी शासन निर्णय क्र. मातंस २०१२ / प्र. क्र. २७७ / ३९, दि. ०४-०२-२०१३ मधील नमुद केल्यानुसार आवश्यक संगणक अर्हता वा सामान्य प्रशासन विभाग क्रमांक प्रशिक्षण २००० / प्र. क्र. ६१ / २००१ / ३९, दि. १९-०३-२००३ व शासन अधिसुचना क्र.एसआरव्ही २०१७ / प्र. क्र. ४६२ / कार्या.१२, दि.२८.०५.२०१८ मधील तरतुदीनुसार आवश्यक संगणक पात्रतेची अर्हता वा महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांच्याकडील अधिकृत MS-CIT परिक्षा प्रमाणपत्र यापैकी एक प्रमाणपत्र तसेच माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाद्वारे वेळोवेळी विहित केलेले संगणक अर्हता नियुक्तीच्या दिनांकापासुन दोन वर्षाच्या आत देणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांची यथास्थिती शासकीय सेवा समाप्त करण्यात येईल. तसेच याबाबत शासनाच्या वेळोवेळीच्या दुरुस्ती / आदेशानुसार याबाबत पुर्तता करणे क्रमप्राप्त राहील.

१३. उमेदवाराच्या शैक्षणिक अर्हता व इतर कागदपत्राबाबत भविष्यात केव्हाही काही अडचण निर्माण झाल्यास/ खोटे आढळल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी त्यांची राहिल व नियुक्ती रद्द करण्यात येईल.

१४.सदर पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीस, आयुक्त वेळोवेळी विनिर्दिष्ट करतील अशा कालावधीचे, स्वरुपात आणि त्याठिकाणी शारीरिक प्रशिक्षण (यामध्ये पोलीस प्रशिक्षणचा समावेश आहे) व मद्य व मद्यार्क निर्माणीचे प्रशिक्षण घ्यावे लागेल. यॆा प्रशिक्षणामध्ये राज्य उत्पादन शुल्क विभागाने अंमलबजावणी करावयाच्या कायद्यांचा अभ्यास आणि त्या कायद्यांमध्ये विहित केलेली राज्य उत्पादन शुल्क अधिकाऱ्यांची कार्ये आणि कर्तव्याबाबतच्या तरतूदी यांचा समावेश असेल.

१५.या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक इएसटी १३२००६/६८/२अ-३ दि.१५/०३/२००७ परिपत्रकानुसार पोहण्याची कला अवगत करणे आवश्यक राहील.

१६. जवान संवर्ग राज्यस्तरीय संवर्ग आहे म्हणून सबब आपली बदली महाराष्ट्रात कोठेही करण्यात येईल.

१७.नियुक्ती दिलेल्या जिल्हयात हजर झाल्यानंतर जिल्हा/विभाग स्तरावरुन पदस्थापनाबाबतचे स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्यात येतील.

१८. शासन सेवेत नियुक्त झालेल्या उमेदवारास नवीन परिभाषी अंशदान निवृत्ती वेतन योजना किंवा केंद्र शासनाची एकीकृत निवृतीवेतन योजना किंवा राज्य शासनाची सुधारीत राष्ट्रीय निवृतीवेतन योजना किंवा याबाबत शासन वेळोवेळी निश्चित करेल, ती योजना / नियम लागू राहतील. सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण), नियम १९८४ आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू होणार नाही.

१९. जर कोणताही उमेदवार, केंद्र/ राज्य शासनाच्या सेवेत कार्यरत असेल तर सदर उमेदवाराने शासकीय सेवेचा राजीनामा दिल्याबाबत संबंधित शासकीय विभागाकडून ना-हरकत प्रमाणपत्र / राजीनामा सादर करणे बंधनकारक राहील. तद्नंतर पदस्थापनेच्या ठिकाणी रुजु होता येईल. अन्यथा त्यांची नियुक्ती रद्द करण्यात येईल.

२०. लहान कुटुंबाबाबतचे प्रमाणपत्रात/ स्वयं घोषणापत्रात दिलेली माहिती चुकीची आढळून आल्यास नियुक्ती रद्द करण्यात येईल. तसेच समांतर आरक्षणातील प्रमाणपत्र (प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त इ.) बाबतच्या प्रमाणपत्राच्या आधारे एकदाच शासकीय सेवेचा लाभ घेता येतो. यापूर्वी सदर प्रमाणपत्राच्या आधारे लाभ घेतला असल्याचे निदर्शनास आल्यास या आदेशाद्वारे देण्यात आलेली नियुक्ती रद्द करण्यात येईल.

२१. विभागातील आपली नियुक्ती निव्वळ तात्पूरती असून आपणास कोणत्याही प्रकारची पूर्वसूचना अगर नोटीस न देता अथवा कारणे न दाखविता शासकीय सेवेतून कमी करण्यात येईल. आपली नोंकरी जर पुढे सुरु राहिली व आपणास शासकीय सेवेचा राजीनामा द्यावयाचा असेल तर शासन परिपत्रक सा.प्र.वि.क्र. एमआरव्ही १०७२/३२८२/ड दि.०४/०१/१९७३ च्या तरतूदींनुसार आपणास १ महिन्याची आगाऊ नोटीस द्यावी लागेल अथवा एक महिन्याचे मूळ वेतन शासन जमा करावे लागेल.

( डॉ. राजेश देशमुख )
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

श्री. प्रविण सिद्राम करमले,
मु.पो. सावरगांव, ता. जि. लातुर-४१३५३१
pravinkarmale2512@gmail.com

D:\Raam\Recruitment\Constable-V.docx